महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा मान्यता देणे व विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी ऑनलाईन संगणक प्रणाली ई-निविदा पध्दतीने विकसित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्रमांक: ईगव्ह १५१०/प्र.क्र. २४/संगणक
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २४ ऑक्टोबर, २०१७.

वाचा :- शासन निर्णय क्र.एसएफएस १०१६ / प्र.क्र.१४२, एस.एम-२ दि.१४.७.२०१७

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ लागू आहे. या कायद्यांतर्गत प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरीता नवीन शाळा स्थापन करण्यासाठी व विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करणेसाठी इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन प्रस्ताव मागविण्यात येतात. सर्व संबंधितांना अवगत होण्यासाठी स्थानिक मुख्य वृत्तपत्रांच्या माध्यमातून जाहीरातीव्दारे कळविण्यात येते अशी सध्याची कार्यपध्दती अस्तित्वात आहे. गुणवत्तापूर्ण निकोप स्पर्धा वाढीस लागण्यासाठी, अकार्यक्षम शाळा वेळीच बंद करण्यासाठी युडायस कोड घेऊन सरल प्रणालीच्या माध्यमातून अकार्यक्षम शाळांचे सनियंत्रण करणे गरजेचे आहे. तसेच प्रचलित शाळा परवानगी प्रक्रियेत बदल करुन कार्यपध्दती अधिक सुलभ होण्यासाठी ई गव्हर्नन्स अंतर्गत सुधारित कार्यपध्दती अवलंबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

प्रकल्प अमंलबजावणी समितीच्या दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे स्वयंअर्थसहाय्यित कायद्यातंर्गत शाळा सुरु करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. ही संगणक प्रणाली ई-निविदा पध्दतीने विकसित करण्यासाठी आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरुन ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षातील "मागणी क्रमांक ई-२, २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ८०, सर्वसाधारण, ८००, इतर खर्च पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२) संकिर्ण, (०२)(५१), ई-गव्हर्नन्स कार्यक्रम, ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२०२ H४५४)" या लेखाशिर्षातंर्गत मंजूर निधीतून भागविण्यात यावा. तसेच सदर लेखाशिर्षातून खर्च करण्यासाठी सहायक संचालक (लेखा), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर

संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास येणाऱ्या खर्चापोटी निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी देयके त्यांचेकडे सादर करावीत.

३. हे आदेश वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-२०१५ दिनांक १७ एप्रिल २०१५ मधील उपविभाग २ मधील अनुक्रमांक २७ अ वरील नियम ७६ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०२४१२३१३९४९२१ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2017.10.24 12:20:59 +05'30'

(चारुशीला चौधरी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक.
२. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे.
५. संचालक, विद्या प्राधिकरण, पुणे.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे.
७. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे स्वीय सहायक.
८. निवडनस्ती.

****